महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पी-कॉम/लेखा/विद्युत शुल्क परतावा/** 029535 **दिनांक :** 27 SEP 2016

## वाणिज्य परिपत्रक क्र.२६८

**विषय: महाराष्ट्र शुल्क अधिनियम, १९५८ विद्युत शुल्क वसुली व परताव्याबाबत .**

**संदर्भ:**
१) शासनाचे पत्र क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७/ऊर्जा-१ दि.०५.०७.२०१३
२) शासन निर्णय, ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.पीएसआय-२०१३/ प्र.क्र.५४/ऊद्योग-८ दि.०१.०४.२०१३.
३) शासन पत्र क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१ दि.११.०२.२०१५.
४) शासन पत्र क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१ दि.२६.०३.२०१५.
५) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ भाग-१/ ऊर्जा-१ दि.०६.०४.२०१५.
६) वाणिज्य परिपत्रक क्र.२४१ दि.१८.०५.२०१५.
७) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ भाग-१/ ऊर्जा-१ दि.०८.०७.२०१६.
८) शासन शुध्दीपत्रक क्र. इएलडी-२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१ दि.०३.०८.२०१६.

महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ मधील कलम ५ क तसेच कलम कलम ३ (२) नुसार राज्य शासनाला राजपत्रातील अधिसुचनेद्वारा सूट देण्याचे अधिकार असून उद्योगांना वेळोवेळी वीज शुल्क माफ करण्यात आला आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना-२००७ अन्वये पात्र उद्योगास सूट देण्याबाबत मुंबई वीज शुल्क नियम, १९६२ चे नियम १६ व १७ नमूद केल्याप्रमाणे संबंधित उद्योगाने अर्ज करणे आवश्यक असून अर्ज प्राप्त झाल्यानंतर योग्य ती तपासणी करुन विद्युत शुल्क सूट देण्याची कार्यवाही संबंधित वीज वितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे. शासनाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार पात्र विद्युत ग्राहकांसंबंधात विद्युत शुल्क भरण्यासाठी सूट दिलेली आहे अथवा मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८ च्या अनुसूचीमधील भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ग्राहकाच्या बाबतीत पात्रता प्रमाणपत्र विलंबाने सादर केल्यामुळे किंवा वेगळया दरामुळे (Misclassification) विद्युत शुल्क आकारण्यात आल्याने परतावा अनुज्ञेय होतो. या संबंधी शासनाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या असून संदर्भाधीन दि.११.०२.२०१५ च्या सूचनेद्वारे वीज वितरण कंपन्यांकडून विद्युत शुल्क सूट व परतावा या संबंधित देण्यात आलेले अधिकार रद्द करण्यात आले होते व तद्नंतर शासन निर्णय दि.०६.०४.२०१५ अन्वये वीज वितरण कंपन्यांमार्फत विद्युत सुट दिल्यानंतर विद्युत शुल्क परतावा प्रकरणी निर्णय घेण्यासाठी शासनस्तरावर समितीची स्थापना करण्यात आली होती.

विद्युत शुल्क परतावा प्रकरणे जलदगतीने हाताळली जावीत या दृष्टीने आता दिनांक ०६.०४.२०१५ च्या शासन निर्णयानुसार विद्युत शुल्क वसुली / परताव्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेली समिती बरखास्त करुन विद्युत शुल्क सूट / परताव्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे नवीन कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने आपणास निर्देश देण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खालील नमुद केलेल्या नवीन कार्यपध्दतीनुसार विद्युत शुल्क सूट परतावा प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) विद्युत शुल्क परताव्याचा आणि माफीचा अर्ज ग्राहकाने वाणिज्य परिपत्रक क्र. २०४ प्रमाणे ऑनलाईन केल्यानंतर प्रथम विद्युत शुल्क माफीची कार्यवाही सदर परिपत्रकात नमुद केलेल्या पध्दतीनुसार संगणकीय ऑनलाईन प्रणाली मार्फत करण्यात येईल.(वरील अधिकार वाणिज्य परिपत्रक क्र. २०४ नुसार संबंधीत अधिक्षक अभियंता यांना आहेत)

२) विद्युत शुल्क माफीच्या कार्यवाहीनंतर महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ विद्युत शुल्क सूट परताव्या संदर्भातील प्रकरणी संबंधित ग्राहकाने प्रथमतः संबंधित वीज वितरण कंपन्याकडे अर्ज सादर केल्यानंतर संबंधित मंडळ कार्यालयाने सदर अर्ज तपासून/लेखा परिक्षित करुन परस्पर आपल्या शिफारशीसह ७ दिवसात संबंधित विद्युत निरीक्षकांकडे पाठवावेत.

३) विद्युत शुल्क परताव्याच्या रु. १० लाखा पेक्षा कमी रक्कमेच्या विद्युत शुल्क माफी परतावा प्रस्ताव विद्युत निरीक्षक यांचे स्तरावर शासन निर्णयानुसार गठीत केलेल्या समितीच्या मंजूरीसाठी पाठवावे. विद्युत शुल्क परताव्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| विद्युत निरीक्षक | - | अध्यक्ष |
| जिल्हा उद्योग अधिकारी | - | सदस्य |
| संबंधित वीज वितरण कंपनीचे प्रतिनिधी (कार्यकारी अभियंता समकक्ष) | - | सदस्य |
| विद्युत शुल्क निरीक्षक/ सहाय्यक विद्युत शुल्क निरीक्षक | - | सदस्य-सचिव |

वरील समितीचा सदस्य म्हणून संबंधित मंडळ कार्यालयाचे वरिष्ठ व्यवस्थापक (वि व ले) / कार्यकारी अभियंता (आस्था.) असतील.

३) विद्युत निरीक्षक हे रु.१० लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या परतावाबाबतचे प्रस्ताव तपासणी करुन स्वयंस्पष्ट अहवालासह मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांच्याकडे वीज वितरण कंपनीकडून अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करतील. तसेच मुख्य विद्युत निरीक्षक हे स्वयंस्पष्ट अहवालासह प्रस्ताव १५ दिवसाच्या आत शासनाकडे सादर करतील.

४) रु. १० लाखापेक्षा अधिक रक्कमेचे सर्व विद्युत शुल्क परतावा प्रस्तावांबाबत निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा), यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| • प्रधान सचिव / सचिव (ऊर्जा) | अध्यक्ष |
| • उद्योग संचालनालयाचे प्रतिनिधी / (उप संचालक दर्जाचे) | सदस्य |
| • संबंधित वीज वितरण कंपनीचे प्रतिनिधी / (मुख्य अभियंता (वाणिज्य) ) | सदस्य |
| • मुख्य विद्युत निरीक्षक | सदस्य सचिव |

विद्युत शुल्क सूट परतावा देण्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यातून एकदा किंवा प्रकरणांची संख्या विचारात घेऊन महिन्यातून एकदा समितीची बैठक शासन स्तरावर घेण्यात येईल. त्यानंतर सदर प्रस्ताव निकाली काढून शासनाच्या मान्यतेनंतर आदेश पारित करण्यात येतील.

विद्युत शुल्क सूट परताव्याबाबतची रक्कम मंजूरीचे आदेश शासनाकडून महावितरण कंपनीस प्राप्त झाल्यानंतर सदर विद्युत शुल्क परताव्याची रक्कम रोखीत परतावा न करता संबंधीत विद्युत ग्राहकाच्या पुढील देयकामध्ये थेट समायोजित करण्याबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात येईल. शासनाच्या वरील आदेशाप्रमाणे विद्युत शुल्क परताव्याची रक्कम सरळ संगणकीय प्रणालीद्वारे ग्राहकाच्या पुढील देयकामध्ये समायोजित करण्याकरीता, मानवी हस्तक्षेप टाळण्याकरीता व ग्राहकास जलद गतीने सेवा मिळण्याकरीता वर गठीत केलेल्या समितीने मंजुर केलेली प्रकरणे कळविण्याकरीता संबंधित समितीस मुख्य कार्यालयामार्फत विशेष संकेतस्थळ कळविण्यात येईल व तद्नंतर मुख्य माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संगणकीय प्रणालीद्वारे देण्यात आलेल्या विहित संकेत स्थळावर प्राप्त झालेली प्रकरणे ग्राहकाच्या खाते थेट जमा करणेबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल. संगणकीय प्रणालीमार्फत प्रत्येक महिन्यात वर्ग केलेल्या परतावा रक्कमेचा संगणकीय तपशील शासनास, मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई व संबंधित विद्युत निरीक्षक कार्यालयास ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल.

यापुढे आपल्या कार्यालयास विद्युत शुल्क परताव्या संबंधीची प्राप्त झालेली प्रकरणे विभागीय व मंडळ स्तरावर लेखा परिक्षित करुन विहित कालावधीमध्ये विद्युत निरिक्षक यांजकडे संबंधित मंडळ कार्यालयाच्या मार्फत पुढील कार्यवाहीसाठी विना विलंब सादर करावेत. तसेच सदर प्रस्तावाची प्रत या कार्यालयास माहितीकरिता पाठवावी. सोबत शासन निर्णय दि.०८.०७.२०१६ ची प्रत जोडली आहे.

27.9.16
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :**

१) मा. प्रधान सचिव (ऊर्जा-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) संचालक (संचालन), महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
३) संचालक (वित्त), महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह सादर :**

१) सर्व मुख्य अभियंता, महावितरण, संवसु परिमंडळ कार्यालय.
२) मुख्य महाव्यवस्थापक / (सांघिक लेखा) /(निगम वित्त)/(माहिती तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.
३) मुख्य विद्युत निरिक्षक,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ३ रा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व), मुंबई-४०० ०७१.
--- माहिती व उचित कार्यवाहसाठी

**प्रत रवाना :**

१) सर्व अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ कार्यालय, महावितरण.
२) महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकॉंग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३) सर्व कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालय, महावितरण.
४) सर्व उपकार्यकारी अभियंता / सहाय्यक अभियंता, संवसु उपविभागीय, महावितरण कार्यालय.
--- उचित कार्यवाहीसाठी.

विद्युत शुल्क सूट व परतावा
संबंधी सुधारित कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ८ जुलै, २०१६

संदर्भ :- १) शासनाचे पत्र क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७/ऊर्जा-१, दि.०५.०७.२०१३
२) शासननिर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. पीएसआय-२०१३/ प्र.क्र.५४/उद्योग-८, दि. ०१.०४.२०१३
३) शासन पत्र क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा -१, दि. ११.०२.२०१५
४) शासन पत्र क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१, दि. २६.०३.२०१५
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी -२०१३/ प्र.क्र.७९/ भाग-१/ऊर्जा-१,दि. ०६.०४.२०१५

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ मधील कलम ५ क तसेच कलम ३ (२) नुसार राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारा सूट देण्याचे अधिकार असून उद्योगांना वेळोवेळी वीज शुल्क माफ करण्यात आले आहे. सामूहिक प्रोत्साहन योजना-२००७ अन्वये पात्र उद्योगास सूट देण्याबाबत मुंबई वीज शुल्क नियम, १९६२ चे नियम १६ व १७ नमूद केल्याप्रमाणे संबंधित उद्योगाने अर्ज करणे आवश्यक असून अर्ज प्राप्त झाल्यानंतर योग्य ती तपासणी करून विद्युत शुल्क सूट देण्याची कार्यवाही संबंधित वीज वितरण कंपनीमार्फत करण्यात येते. शासनाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार पात्र विद्युत ग्राहकांसंबंधात विद्युत शुल्क भरण्यासाठी सूट दिलेली आहे. अथवा मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८ च्या अनुसूचीमधील भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ग्राहकाच्या बाबतीत पात्रता प्रमाणपत्र विलंबाने सादर केल्यामुळे किंवा वेगवेगळया दरामुळे (Misclassification) विद्युत शुल्क आकारण्यात आल्याने परतावा अनुज्ञेय होतो. या संबंधी शासनाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या असून संदर्भाधीन दि. ११.०२.२०१५ च्या सूचनेद्वारे वीजवितरण कंपन्यांकडून विद्युत शुल्क सूट व परतावा या संबंधित देण्यात आलेले अधिकार रद्द करण्यात आले होते व तद्नंतर शासन निर्णय दि. ६.४.२०१५ अन्वये वीज वितरण कंपन्यांमार्फत विद्युत सूट दिल्यानंतर विद्युत शुल्क परतावा प्रकरणी निर्णय घेण्यासाठी शासनस्तरावर समितीची स्थापना करण्यात आली होती.

**शासन निर्णय :-**

विद्युत शुल्क परतावा प्रकरणे जलदगतीने हाताळली जावीत या दृष्टीने आता दिनांक ०६.०४.२०१५ च्या शासन निर्णयानुसार विद्युत शुल्क वसुली / परताव्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेली समिती बरखास्त करून विद्युत शुल्क सूट/ परताव्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे नवीन कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ विद्युत शुल्क सूट/परताव्यासंदर्भातील प्रकरणी संबंधित ग्राहकाने प्रथमत: संबंधित वीज वितरण कंपन्याकडे अर्ज सादर करावा. संबंधित वीज वितरण कंपनीने सदर अर्ज तपासून त्यांच्या शिफारशीसह ७ दिवसात संबंधित विद्युत निरीक्षकांकडे पाठवावा.

२. विद्युत शुल्क/परताव्याच्या रू. १० लाखा पेक्षा कमी रक्कमेच्या विद्युत शुल्क माफी परतावा प्रस्तावाबाबत विद्युत निरीक्षक यांचे स्तरावर पुढील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

- विद्युत निरीक्षक - अध्यक्ष
- जिल्हा उद्योग अधिकारी - सदस्य
- संबंधित वीज वितरण कंपनीचे प्रतिनिधी (कार्यकारी अभियंता समकक्ष)- सदस्य
- वीज कर निरीक्षक/मुख्य लिपिक - सदस्य सचिव

वरील समितीने परतावा प्रकरणाबाबत **१५** दिवसात निर्णय घेऊन आदेश पारित करावेत.

विद्युत निरीक्षक यांनी रु. १० लाखा पेक्षा अधिक रक्कमेच्या परतावाबाबतचे प्रस्ताव तपासणी करुन स्वयंस्पष्ट अहवालासह मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांच्याकडे वीज वितरण कंपनीकडून अर्ज प्राप्त झाल्यापासून **१५ दिवसाच्या** आत सादर करावेत. तसेच **मुख्य विद्युत निरीक्षक यांनी** स्वयंस्पष्ट **अहवालासह सदर प्रस्ताव १५ दिवसाच्या** आत **शासनास** सादर करावेत.

३. रु. १० लाखा पेक्षा अधिक रक्कमेचे सर्व विद्युत शुल्क परतावा प्रस्तावांबाबत निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

- प्रधान सचिव/सचिव (ऊर्जा) अध्यक्ष.
- उद्योग संचालनालयाचे प्रतिनिधी/(उप संचालक दर्जाचे) सदस्य
- संबंधित वीज वितरण कंपनीचे प्रतिनिधी/ (मुख्य अभियंता दर्जाचे अधिकारी) सदस्य
- मुख्य विद्युत निरीक्षक सदस्य सचिव

विद्युत शुल्क सूट/परतावा देण्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यातून एकदा किंवा प्रकरणांची संख्या विचारात घेऊन महिन्यातून एकदा समितीची बैठक आयोजित करून प्रकरणे निकाली काढून शासनाच्या मान्यतेनंतर आदेश पारित करावेत.

विद्युत शुल्क सूट/ परताव्याबाबतची रक्कम मंजूर झाल्यास ती त्याच ग्राहकाच्या पुढील बिलात समायोजित करण्याचे आदेश वीज वितरण कंपन्यांना देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत रोखीने परतावा करण्यात येऊ नये.

यासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा एकत्रित अहवाल विद्युत निरीक्षक यांनी दर **महिन्यास** मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई व शासनाकडे सादर करावा.

तसेच ग्राहकाने सादर केलेल्या परताव्याच्या एखाद्या प्रस्तावाबाबत संदिग्धता असल्यास विद्युत निरीक्षक यांनी त्याबाबत शासनाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करावी.

विद्युत शुल्क सूट/परताव्याच्या सूचना सरळ संगणकीय प्रणालीद्वारे ग्राहकास परतावा प्राप्त होण्याबाबत ती थेट ग्राहकाच्या वीज देयकात समायोजीत होईल, अशा प्रकारची संगणकीय प्रणाली संबंधित वीज वितरण कंपन्यानी तसेच मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांनी तीन महिन्यात विकसित करावी. जेणेकरुन परतावा प्रकरणात मानवी हस्तक्षेप टाळता येईल व ग्राहकास जलद गतीने व कोणत्याही कार्यालयात न जाता देयकात परतावा मिळणे सोईस्कर होईल.

सध्या शासनस्तरावर प्राप्त झालेली विद्युत शुल्क सूट/परताव्याची प्रकरणे तातडीने विद्युत निरीक्षक/मुख्य विद्युत निरीक्षक यांनी त्यांच्या अखत्यारितील सदर सर्व प्रकरणे प्राथम्याने १५ दिवसाच्या आत वर नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार निकाली काढावीत.

४. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विद्युत शुल्क माफी संबंधातील अधिसूचनांस अनुसरुन सर्व प्रकारच्या विद्युत शुल्क सूट व परतावा संबंधित पुढील कार्यवाही वरील दिलेल्या निर्देशाप्रमाणे महावितरण, टाटा, रिलायन्स व बेस्ट या वीज वितरण कंपन्यांनी करावी.

५. विद्युत शुल्क सूट/परताव्याची जुन्या कालावधीतील म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर,२०१५ अगोदरची प्रकरणे संबंधित ग्राहकांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत सादर करता येतील. तदनंतर दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वीची प्रकरणे, कोणत्याही परिस्थितीत, वीज वितरण कंपन्यांनी/विद्युत निरीक्षकांनी विचारात घेवू नयेत. जुन्या कालावधीतील जी प्रकरणे यापूर्वीच ग्राहकांनी सादर केलेली आहेत, त्याबाबत वीज वितरण कंपन्यांनी/विद्युत निरीक्षकांनी/मुख्य विद्युत निरीक्षकांनी उपलब्ध अभिलेखाच्याद्वारे सखोल पडताळणी करून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी निकाली काढण्यासाठी वरील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी.

६. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ११८/१६/व्यय-१६, दि. २३.३.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१६०७०८१५५५०५०३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Namita N Patil Digitally signed by Namita N Patil DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Namita N Patil Date: 2016.07.08 16:03:32 +05'30'

(न.नं.पाटील)
शासनाचे सह सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. अप्पर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२
७. अप्पर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२
८. प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई-३२
९. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
१०.मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ३रा मजला, प्रशासकीय इमार, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू), मुंबई-७१
११.विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
१२.महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
१३.महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) -२ महाराष्ट्र नागपूर
१४.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५.अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
१६.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१७.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. सर्व मंत्रालयीन विभाग
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधार कंपनी हॉंगकॉंग बिल्डींग, ४ मजला, हुतात्मा चौक, मुंबई-२३
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

२१.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई-५१
२२.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. प्रकाशगड,वांद्रे (पुर्व), मुंबई-५१
२३.वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
२४.व्यवस्थापकीय संचालक, द टाटा पावर कंपनी लिमिटेड, बॉम्बे होऊस, २४, होमी मोदी स्ट्रिट,मुंबई-४००००१
२५.व्यवस्थापकीय संचालक, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि,, इ-७, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३
२६.महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,मुंबई-०५
२७.सर्व विद्युत निरीक्षक
२८.सर्व जिल्हा उद्योग अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र
२९.निवड नस्ती.

R-45281/2016

विद्युत शुल्क सूट व परतावा
संबंधी सुधारित कार्यपध्दती
शुध्दीपत्रक

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०१६

पहावे :- शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि. ०८.०७.२०१६

शुध्दीपत्रक

विद्युत शुल्क सूट व परतावा संबंधी सुधारीत कार्यपध्दतीच्या उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि. ८ जुलै, २०१६ मधील परिच्छेद २ मध्ये रुपये १० लाखापेक्षा कमी रक्कमेच्या विद्युत शुल्क माफी प्रस्तावाबाबत, विद्युत निरीक्षक यांचे स्तरावर गठित करावयाच्या समितीच्या सदस्य सचिवपदी "बीजकर निरीक्षक/मुख्य लिपिक" या ऐवजी "विद्युत शुल्क निरीक्षक/सहाय्यक विद्युत शुल्क निरीक्षक" असे वाचण्यात यावे.

तसेच त्यापुढील परिच्छेदापूर्वी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"वरीलप्रमाणे मुख्य विद्युत निरीक्षक यांनी जिल्हानिहाय समित्या गठीत करण्यासाठी आवश्यक त्या सूचना सर्व विद्युत निरीक्षकांना तातडीने दयाव्यात. तसेच कार्यरत विद्युत शुल्क निरीक्षक/सहाय्यक विद्युत शुल्क निरीक्षक यांची संख्या विचारात घेवून त्यांना जिल्हानिहाय समित्यांवर नियुक्ती करण्यासंदर्भात सविस्तर आदेश काढावेत."

हे शुध्दीपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संकेताक २०१६०८०३१११८५५८४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhimashankar Yallapa Manta
Digitally signed by Bhimashankar Yallapa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Bhimashankar Yallapa Manta
Date: 2016.08.03 11:25:21 +05'30'

(भि.य.मंता)
शासनाचे उप सचिव

प्रति,
१. मा.राज्यपाल यांचे सचिव

Date: 12/8/16
S. E. (Com.I)
S. E. (Com.II)
S. E. (CP)
S. E. (RUC)
GAD
ALO

M.S.E.D.C.L.
CE PP
GM (F&A)
SE (PP)
SE (I)
E.E. (Adm/HR-Section)

२. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. अप्पर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२
७. अप्पर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२
८. प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई-३२
९. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
१०. मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ३रा मजला, प्रशासकीय इमार, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू), मुंबई-७१
११. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
१२. महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
१३. महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) -२ महाराष्ट्र नागपूर
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५. अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
१६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. सर्व मंत्रालयीन विभाग
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधार कंपनी हॉगकॉंग बिल्डींग, ४ मजला, हुतात्मा चौक, मुंबई-२३
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई-५१
२२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई-५१
२३. वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
२४. व्यवस्थापकीय संचालक, द टाटा पावर कंपनी लिमिटेड, बॉम्बे होऊस, २४, होमी मोदी स्ट्रिट, मुंबई-४००००१
२५. व्यवस्थापकीय संचालक, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., इ-७, एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३
२६. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई-०५
२७. सर्व विद्युत निरीक्षक
२८. सर्व जिल्हा उद्योग अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र
२९. निवड नस्ती-ऊर्जा-१